जा.क्र. का.15/परिपत्रक/मूल्यांकन/ 1072
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे-1,
दिनांक : 16 /11/2017

**परिपत्रक :-**

**विषय :-** महाराष्ट्रातील ग्रामीण व प्रभाव क्षेत्रातील गावांचे महामार्गासन्मुख जमिनी व गावठाण परिघस्त क्षेत्रातील स.नं. / ग.नं. च्या तपशीलाबाबत.

महाराष्ट्रातील ग्रामीण व प्रभाव क्षेत्रातील गावांचे राष्ट्रीय व राज्य महामार्गासन्मुख व गावठाण परिघस्त क्षेत्रातील स.नं./ग.नं. चा तपशील MRSAC कडून घेऊन, त्यानुसार वार्षिक मूल्यदर तक्ते अद्यावत करण्यात आले. आहेत. तथापि, प्रत्यक्षात जागांच्या खरेदी विक्री व्यवहारांची नोंदणी करताना, काही स.नं. / ग.नं. महामार्गासन्मुख अथवा गावठाण परिघस्त क्षेत्रात नसताना ते स.नं./ग.नं. महामार्गसन्मुख /गावठाण परिघस्त क्षेत्रात नमूद केले गेल्याचे निदर्शनास येत आहे. याबाबतच्या दुरुस्तीसाठी खालीलप्रमाणे सूचना देणेत येत आहे.

1) ग्रामीण क्षेत्रातील गावामधील स.नं. / ग.नं. चुकीने महामार्गासन्मुख दर्शविला गेला असेल किंवा स.नं./ग.नं. महामार्गासन्मुख असून, तो महामार्गासन्मुख स.नं./स.नं. च्या यादीत समाविष्ट नसेल तर, संबंधित विभागाच्या सहायक संचालक, नगर रचना, मूल्यांकन यांनी आवश्यक कागदपत्रासह, आवश्यकतर सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभिलेखाची खातरजमा करुन, स.नं./ग.नं.ची सुधारित यादी संबंधी दुय्यम निबंधक व सह जिल्हा निबंधक यांना पाठवावी. एखाद्या स.नं./ग.नं. चा हिस्सा महामार्गासन्मुख नाही म्हणून तो महामार्गासन्मुख स.नं./ग.नं. च्या यादीतून वगळण्यात येऊ नये. एखादा स.नं.चे काही हिस्से / हिस्सा महामार्गासन्मुख नसल्यास अशा जमिनीचा दस्त नोंदविताना दस्तात सदर वस्तुस्थिती नमूद असणे व त्यासंबंधीचा हिस्स्याचा अधिकृत मोजणी नकाशा दस्तासोबत जोडणे आवश्यक आहे. अशा हिस्सा / हिस्स्याचे, जिरायत जमिनी आकार गटानुसार अथवा 7/12 उताऱ्यावरील पिकपाणी नोंदीनुसार हंगामी बागायत/ बारमाही बागायत, फळबागा, ऊसशेती ई. असल्यास त्याबाबतच्या सूचना विचारात घेऊन मूल्यांकन करणेत यावे.

2) MRSAC कडील तपशीलानुसार वार्षिक मूल्यदर तक्त्यामध्ये प्रभाव क्षेत्रातील एखादा स.नं. / ग.नं., 500 मी. गावठाण परिघस्त क्षेत्राबाहेर दर्शविला असल्यास व प्रत्यक्षात तो 500 मी. गावठाण परिघस्त क्षेत्रात येत असल्याची आवश्यक कागदपत्राआधारे खात्री झाल्यास, जागेचा विद्यमान वापर, प्रादेशिक योजनेप्रमाणे अनुज्ञेय वापर, जागा अकृषिक आहे किंवा कसे याबाबत पडताळणी करुन, सदर स.नं./ग.नं. गावठाण परिघस्त क्षेत्राच्या, योग्य त्या मूल्यविभागात समाविष्ट करण्याबाबत नोंदणी महानिरीक्षक यांची मंजूरी घ्यावी. ज्या गावासाठी 200 मी. गावठाण परिघस्त दर्शविले आहे त्यासाठी सदर कार्यवाही अपेक्षित नाही.

सही/-
(अनिल कवडे)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत माहितीसाठी सादर :-

1) मा. प्रधान सचिव, महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभाग, मंत्रालय मुंबई-32

प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी :-

3) सह नोंदणी महानिरीक्षक, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.

4) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, (मुख्यालय), पुणे.

5) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, (संगणक), पुणे.
/- सदर परिपत्रकाची प्रत विभागाच्या संकेतस्थळावर upload करणेबाबतची कार्यवाही करणेत यावी.

6) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/लातूर/अमरावती/नागपूर
/- सदर परिपत्रकाची प्रत आपले अधिनस्त सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी व नोंदणी कार्यालयांना पुरविणेत यावी. तसेच सदर परिपत्रक त्यांना प्राप्त झाले असून, ते वाचलेबाबत (Read & acknowledge) त्याच्या कार्यालयाचा अहवाल प्राप्त करुन घेऊन या कार्यालयास पाठविणेत यावा.

7) सहायक संचालक, नगर रचना, मूल्यांकन, कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

8) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.

9) श्रीमती निलीमा देसाई, NIC, पुणे.

निर्गमित

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणेकरिता.